# बी एस पाटील महाविद्यालय, परतवाडा जि अमरावती
## वाणिज्य विभाग अहवाल
## सत्र 2016-17

सत्र 2016-17 मध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले होते. शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला विभागीय सभेचे आयोजन करण्यात आले व त्यामध्ये संपुर्ण वर्षाची रुपरेषा आखण्यात आली तसेच विविध प्राध्यापकांकडे विविध विषय अध्यापनाचे काम वाटप करण्यात आले. नवीन येणाऱ्या बीकॉम प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची Entry Level Exam घेण्यात आली. त्यातून विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता तपासण्यात आली व त्याच चाचणी परीक्षेच्या निकालावर त्या त्या विषयाचे slow learner व Advanced Learner निवडण्यात आले. त्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी तासिकांचे आयोजन करण्यात आले. सोबतच वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने विषय शिक्षकांनी आपल्या विषयाचे ज्या पध्दतीने समजून सांगावयाचे आहे त्यासाठी विद्यार्थ्यांना कुठली पध्दत योग्य ठरेल यासाठी Brain Storming session चे आयोजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना सत्राच्या शेवटच्या टप्प्यात विषयाची कितपत ओळख झाली यासाठी surprise test घेण्यात आली व अभ्यास सविस्तर समजून त्याची मांडणी कशी करतात यासाठी Open Book test घेण्यात आली तर Question & Answer Session चे आयोजन करून विद्यार्थ्यांचा प्रतिसाद व समस्या लक्षात घेवून Problem Base Learning या सत्राचे आयोजन सुध्दा करण्यात आलेले होते सोबतच seminar व Group Discussion चे आयोजन करण्यात आले.त्याचबरोबर बीकॉम अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांकडून इ-कॉमर्स या विषयाशी निगडीत २३६ विद्यार्थ्यांकडून प्रकल्प तयार करून घेण्यात आले तर एम कॉम च्या चवथ्या सेमीस्टर च्या विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवर ४९ प्रकल्प तयार करून घेण्यात आले. यासोबतच वाणिज्य विभागांतर्गत विविधा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये दि. 01 जुलै 2016 रोजी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली. आज पर्यावरण समतोलं राखणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. पर्यावरनाचा होणारा ऱ्हास पहाता विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जनजागृती व्हावी या उदेशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यामध्ये प्राचार्य डॉ आर ए उमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम पूर्णत्वास आला. यामध्ये वाणिज्य शाख्येतील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभाग घेतला. त्यानंतर दि. 17 ऑगस्ट 2016 रोजी वाणिज्य

नियोजन मंडळाचे उदघाटन करण्यात आले. ह्या माध्यमातून वर्षभर विविध विद्यार्थी हिताचे कार्यक्रम आयोजित केल्या जाता. वाणिज्य शाख्येतीलं विविध वर्गमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांमधून वर्गानुसार प्रतिनिधी नेमल्या जातात व त्यातून एकाला मंडळाचा अध्यक्ष, एका उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव निवडल्या जाते, यासाठी सर्वांच्या सहमतीने ही प्रकिया पूर्ण केल्या जाते. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्यता विद्यार्थ्यांच्या ह्या मंडळाच्या माध्यमातून केल्या जाते. 17 ऑगस्ट 2016 ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यासाठी उद्धाटक म्हणून प्रा ए पी बिजवे व प्रमुख अतिथी म्हणून प्रा चेडे याना आमंत्रित करण्यात आले होते तर ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ आर ए उमेकर होते. या कार्याक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ ए टी माथने, वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तर प्रा ए एस ढोके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा कु शर्मा ह्यांनी केले. त्यानंतर वाणिज्य विभागाच्या वतीने “स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन- बँकिंग क्षेत्रातील नोकरीच्या संधी” या विषयावर व्याख्यानपर कार्यक्रम 21/08/2016 रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी श्री दर्शन ठाकूर, श्री राहुल गायकवाड व श्री अनूप तायडे या प्रमुख वक्ते म्हणून बोलावण्यात आले होते. स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, बँकिंग क्षेत्रातील अभ्यास कशा पध्दतीने करावा, मार्गदर्शक ग्रंथे कोणकोणते आहेत व बँकिंग कीची परीक्षा पध्दती कशी आहे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर विभागाच्या वतीने नामांकित टी सी एस कंपनीच्या माध्यमातून वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास शिबिराचे आयोजन करण्यात येणार होते. विद्यार्थ्यामध्ये जनजागृती व्हावी, विद्यार्थी स्वयंम प्रेरणेने या मध्ये सहभागी व्हावे म्हणून 23 ऑगस्ट 2016 रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते टी सी एस कंपनीच्या नागपूर शाखेचे श्री रंजन बंडोपाध्याय हे लाभले होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ आर ए उमेकर हे होते. श्री पी एन देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना आपल्यामध्ये कौशल्य कसे विकसित करावे व आपल्याला विविध कंपन्यांमध्ये रोजगार कशा पध्दतीने मिळविता येईल याबाबत मार्गदर्शन केले. या कार्याक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी केले तर प्रा ए एस ढोके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा कु शर्मा ह्यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नीत बी.एस.पाटिल महाविद्यालय, परतवाडा येथे दि. 25 ऑगस्ट 2016 पासून टि.सी.एस कंपनीचे ट्रेनींग सुरु झाले व ते 20 सप्टेंबर 2016 ला पूर्ण झाले. या ट्रेनींगमध्ये विद्यार्थ्यांवर कौशल्य विकासाचे संस्कार करण्यात आले. या ट्रेनींगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील बुध्दीमत्तेचा विचार करुन त्यांच्यामध्ये लपलेल्या सुप्त गुणाना वाव देऊन त्या आधारावर रोजगार मिळवून देणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन 25

ऑगस्ट 2016 ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.ए.उमेकर, टि.सी.एस कंपनीच्या ट्रेनर मिस पदमा, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. ए.टी.माथने, प्रा ढोके याच्या उपस्थित्तीमध्ये पार पडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक व समन्वयक डॉ. नंदकिशोर धोंडगे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.कु विशाखा पाटिल यांनी केले 25 दिवसातील 100 तास चाललेल्या या कार्यक्रमामधून विद्यार्थ्यांना इंगजी भाषा कौशल्य, संवाद कौशल्य,बाजारपेठ कौशल्य, व्यावसायिक संकल्पना, चर्चासत्र, वादविवाद, गटचर्चा, मुलाखत तंत्र इत्यादी विषायांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या ट्रेनीगसाठी 43 मुली निवडलेल्या होत्या व पण 39 विद्यार्थ्यांनी शेवट पर्यंत ह्या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्या.या ट्रेनींग कार्यक्रमाला डॉ.जयपूरकर, संचालक, बी.सी.यू.डी, सं.गा.बा.अ.वि.अमरावती, ॲड.यदुराज मेटकर, अध्यक्ष,भारतीय विद्या मंदीर, अमरावती, डॉ.आराधनाताई वैद्य,सचिव, भारतीय विद्या मंदीर, अमरावती इत्यादी मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देऊन कार्यक्रमाची स्तूती केलेली आहे. या ट्रेनींगच्या समारोपीय कार्यक्रमासाठी व्यासपीठावर डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग, सं.गा.बा.अ.वि.अमरावती व डॉ.गणेश मालटे, संचालक, विद्यार्थी कल्याण व राष्ट्रीय सेवा योजना, सं.गा.बा.अ.वि.अमरावती, डॉ.भैय्यासाहेब मेटकर, सिनेट समिती सदस्य, सं.गा.बा.अ.वि. अमरावती, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.ए.उमेकर,वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. ए.टी.माथने, टि.सी.एस कंपनीच्या ट्रेनर मिस पदमा व कार्यक्रमाचे आयोजक डॉ. नंदकिशोर धोंडगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.कु विशाखा पाटिल यांनी केले तर पाहुण्याचे आभार प्रा. कु अपेक्षा दुबे यांनी मानले,

वाणिज्य विभागाच्या वतीने "बौद्धिक संपदा" या विषयावर विद्यापीठ स्तरीय एक दिवसीय कार्यशाळा आयोजित 12 सप्टेंबर 2016 ला आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना बौद्धिक संपदा या विषयी सविस्तर माहिती व्हावी, त्यांनी स्वतः निर्माण केलेली विविध विषयातील असामान्य ज्ञानाचा धनी किंवा स्वामी तेच राहतील यासाठी कशा प्रकारची व्यवस्था करावी हे समजण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन प्रा अनिल पितळे, सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर ए उमेकर होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी केले तर संचालन प्रा कु. विशाखा पाटील ने केले. त्याचप्रमाणे कार्याशालेच्या पहिल्या सत्रामध्ये प्रा डॉ संजय देशमुख, सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी यांनी मार्गदर्शन केले तर दुसऱ्या सत्रामध्ये प्रा डॉ दाबलीया, टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार यांनी मार्गदर्शन केले तर ह्या दोन्ही सत्राचे अध्यक्ष

स्थान प्रा डॉ ए टी माथने, वाणिज्य विभाग प्रमुख यांनी स्वीकारले. या कार्यक्रमातील सर्वांचे आभार प्रा ए एस ढोके यांनी मानले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती व्दारा संलग्नीत भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे टाटा कन्सलटंसी सर्व्हिस (टि.सी.एस.), नागपूर शाखा व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने "कॅम्पस इंटरव्युव्ह" दि.14 डिसेंबर 2016 रोजी सकाळी 12.00 ला आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयामध्ये दि. 25 ऑगस्ट 2016 ते 20 सप्टेंबर 2016 या काळामध्ये बी.कॉम झालेल्या 43 विद्यार्थीनीची निवड करून टाटा कन्सलटंसी सर्व्हिस (टि.सी.एस.) च्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये निशुल्क 25 दिवस प्रशिक्षण देण्यात आलेले होते. याच प्रशिक्षीत विद्यार्थीनीच्या मुलाखती घेण्यासाठी टाटा कन्सलटंसी सर्व्हिसचे पदाधिकारी उपस्थित झाले होते.त्यामध्ये प्रो.राव, प्रो.अनमोल, व सुरभी देशमुख होत्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या माध्यमातून नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम महाविद्यालय करीत आहे. या मुलाखतीमध्ये एकूण 33 विद्यार्थीनीनी सहभाग दर्शविला होता. या पैकी 15 विद्यार्थीनी पहिल्या टप्यात यशस्वी झाल्या पण अंतिम टप्यामध्ये त्यांचे ज्ञान कमी पडले त्यामुळे कुठल्या ही मुलींची निवड झालेली नाही परंतु या कार्यक्रमाच्या आयोजनामधून विद्यार्थ्यांना मुलाखती कशा द्याच्या, माहितीची देवाण घेवाण कशा पध्दतीने करावी याची कल्पना आली. व परिसर मुलाखतीचे महाविद्यालयात वातावरण निर्माण होवून भविष्यात अशा उपक्रमाचे आयोजन होणार असून त्यामध्ये ते अनुभवासह सहभाग दर्शवितील अशी विद्यार्थीनी ग्वाही दिली. या संपुर्ण कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य शाखेच्या माध्यमातुन करण्यात आले. प्रा.डॉ.नंदकिशोर धोंडगे यांनी समन्वायक म्हनुन काम केले असून संपुर्ण कार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.ए.उमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडल्या गेले.

वाणिज्य विभागाच्या माध्यामातून विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेची जाणीव जागृती व्हावी म्हणून ह्या कार्यक्रमाचे आयोजन 11 जाने. 2017 करण्यात आले होते. सेबीच्या माध्यमातून कशा स्वरूपाची कार्य केल्या जातात, भविष्यामध्ये आपला पैसाची कुठे गुंतवणूक करावी गुंतवणूक सल्लागार कोणाला निवडावे या बाबतची आर्थिक साक्षरता विद्यार्थ्यांमध्ये यावी यासाठी या व्याख्यानाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर ए उमेकर यांनी स्वीकारले तर या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक प्रा डॉ. पिसोळकर, खंडेलवाल महाविद्यालय, अकोला हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा ए एस ढोके यांनी केले तर संचालन प्रा कु.अपेक्षा दुबे ने केले तर कार्यक्रमातील सर्वांचे आभार प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी मानले.

त्यानंतर वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या तांत्रिकज्ञानात वाढ व्हावी यासाठी महाविद्यालयस्तरावर निःशुल्क M S Tally याविषयावर Certificate Course चे 02जानेवारी 2017 ते 12 जाने. 2017 या दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या course चा syllabus महाविद्यालयीन स्तरावर वाणिज्यविभागाच्या प्राध्यापकांनी तयार केलेला असून ह्या Course साठी महाविद्यालयातील 53 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामध्ये B.COM -I , II , III तसेच B A - I, II , III इत्यादी वर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश होता. ह्या सर्व विद्यार्थ्यांचे वर्ग महाविद्यालयातील तासिका संपल्यानंतर घेण्यात येत होत्या. या कोर्सच्या अध्यापनासाठी महाविद्यालयातील तासिका तत्वावर निवडलेले व ह्या विषयामध्ये पारंगत असलेले प्राध्यापकांची निवड करण्यात आली. ह्या कोर्सचा कालावधी 30 तासिकांचा होता व शेवटी संपूर्ण अभ्यासाक्रमावर आधारित परीक्षा घेण्यात आली व त्यांना ग्रेड पध्दतीने निकाल देण्यात आला तसेच त्यांना कोर्स पूर्ण केल्याचे Certificate देण्यातआले.

वाणिज्य विभाग, भगवंतराव शिवाजी पाटिल महाविद्यालय, परतवाडा द्वारा संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा नेमून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार बी.कॉम भाग-3 च्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगाला भेट द्यावी लागते व त्या आधारित एक संशोधन प्रकल्प तयार करावा लागतो. त्यातून विद्यार्थ्यांची विचार करण्याची वृत्ती वाढीस लागावी तसेच विविध विषयांवर प्रकल्प तयार करता यावे हा उद्देश ह्या उद्योग समूहाला भेट या संकल्पनेचा आहे.त्याचअनुषंगाने गुळ निर्मिती उद्योग, बैतुल, मध्यप्रदेश येथे दिनांक 16 फेब्रुवारी 2017 ला भेट देण्यासाठी गेलो होतो. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उद्योगाच्या कार्यपध्दतीचे निरीक्षण केले. तेथील व्यवस्थापका सोबत चर्चा करून उत्पादन व विक्री संबंधीत माहिती समजून घेतली. ह्या उद्योग भेट मध्ये प्रा डॉ माथने, प्रा ए एस ढोके, प्रा डॉ एन एन धोंडगे, प्रा शेळके,प्रा भेंडे, प्रा कु.विशाखा पाटील, कु.अपेक्षा दुबे, प्रा कु. शर्मा इत्यादींनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उद्योगाला भेटया विषयावर प्रकल्प तयार करून सबंधित विषयाच्या प्राध्यापकाकडे सादर केला . ह्या भेटी दरम्यान 236 विद्यार्थी उपस्थित होते.

त्यानंतर वाणिज्य विभागाच्या वतीने वर्गामध्ये सेमिनार चे आयोजन करण्यात आले. सर्व विषयांच्या विविध संकल्पना, चालूघडामोडी, धोरणात्मकविषय, पर्यावरणजनजागृती, व्यावसायिक प्रकल्प इत्यादी विषय देऊन 16 , 17 , 18 फेब्रुवारी 2017 ला faculty अंतर्गत seminar कार्यक्रम राबविण्यात आला. या मध्ये विद्यार्थ्यांनी उत्फुर्तपणे, स्वच्छेने आनंदाने सहभाग घेतला तसेच seminar कसा द्यावा, त्यावर विद्यार्थ्यांनी कशा पद्धतीने प्रश्न विचारावेत याबाबत commerce faculty Commerce Faculty चे विभाग प्रमुख प्रा.डॉ.ए टी माथने यांनी सुरवातीलाच मार्गदर्शन केले.

त्यानंतर Seminar आयोजनासाठी संबंधित विषयाच्या प्राध्यापकांनी आपल्या तासिकामध्ये seminar आयोजित केले. यामधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांनी विविध विषयाचे ज्ञान मिळणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवण्यात आला.

वाणिज्य विभागामार्फत B.Com- III च्या विध्यार्थ्यांकारिता उद्योगाला भेट अंतर्गत बेतुल (M.P.) येथे गुळप्रक्रिया केंद्राला भेट देण्यात आली. तसेच आंतर महाविध्यालय collaboration जगदंब महाविद्यालय सोबत करण्यात आले. व अग्रवाल दाल मिल्स ,परतवाडा सोबत MOU करण्यात आला.

वाणिज्यशाखे अंतर्गत दिनांक 13,14 व 15 फेब्रुवारी 2017 रोजी विविध विषयावर आधारित सर्वच वर्गाचे Group discussion संबंधित विषयाच्या तासिकामध्ये आयोजित करण्यात आले होते. सुरुवातीला Group Discussion म्हणजे काय,विषयावर सखोल चर्चा कशी करावी, प्रत्येक विषयाच्या दोन बाजू कशा असतात इत्यादी सम्पूर्ण बाबीविषयी माहिती प्रा.डॉ. ए. टी. माथने, प्रा. ए एस ढोके व प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी मार्गदर्शन केले.त्यांनतर विविध वर्गा मध्ये Group Discussion पार पाडण्यात आले, यातून विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागली, त्यांनतर कुठल्याही विषयांवर बोलता यावे यासाठीच ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

वाणिज्य विभागांतगर्त बी.कॉम च्या सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेमध्ये कुठल्याही स्वरूपाची अडचण जाणार नाही यासाठी प्रा ए एस ढोके व प्रा डॉ एन एन धोंडगे यांनी 01 मार्चला सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामध्ये परीक्षा पध्दती, प्रश्नाची उत्तरे कशा पध्दतीने लिहावे,जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी कोणती पध्दती वापरावी, वर्णनात्मक किंवा विश्लेषणात्मक प्रश्नाची उत्तरे कसे सोडवावी त्याचप्रमाणे लघुत्तरी प्रश्न व बहुपर्यायी प्रश्न सोडविताना घ्यावयाची काळजी या बाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये परीक्षे बाबत आत्मविश्वास निर्माण झाला व ते परीक्षेला नघाबरता सामोरे जातात.

**वाणिज्य विभाग**

**1) प्रा ए एस ढोके**

**2) प्रा डॉ एन एन धोंडगे**

अशोक एस.ढोके
सहयोगी प्राध्यापक व प्रमुख
वाणिज्य विभाग
बी एस पाटील महाविद्यालय
परतवाडा जि अमरावती